# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०८/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस कन्हान पोलीसांनी केले अटक

दिनांक १५/०८/२०२४ ते १५/०८/२०२४ चे २२/१५ वा. ते २२/३० वा. दरम्यान शिव नगर, फुकट नगर, वार्ड क्र. ४, कन्हान पारशिवनी येथे आरोपी नामे—१) स्वप्नील मराठे उर्फ चुहा, रा.हरिहर नगर,कांद्री कन्हान ता. पारशिवनी नागपूर ग्रा. २) सागर चव्हाण, रा. हरिहर नगर,कांद्री कन्हान ता. पारशिवनी नागपूर ग्रा. ३) विनय उर्फ लक्की भेलावे, रा. नाका नं ७ कांद्री कन्हान, ता. पारशिवनी, कन्हान, जि. नागपूर ग्रामीण ४) अमन पप्पु कैथवास, रा. हरिहर नगर, कांद्री कन्हान ता. पारशिवनी नागपूर ग्रा. आणि फिर्यादी नामे— नंदकिशोर चंदारी सहानी, वय २४ वर्ष , रा. शिव नगर, फुकट नगर, वार्ड क्र. ४, कन्हान पारशिवनी यांच्या मध्ये दिवाळी मध्ये जुआ खेळण्यावरून झगडा झाला होता. तेव्हा स्वप्नील मराठे उर्फ चुहा, रा. हरिहर नगर, कांद्री कन्हान ता. पारशिवनी नागपूर ग्रा यांच्या विरूध्द फिर्यादीने रिपोर्ट दिली होती. तेव्हा स्वप्नील मराठे याने तुझा खानदानला मारून टाकील अशी धमकी दीली होती. तेव्हा पासुन तो जेलमध्ये असल्यामुळे तसेच तो आता जेलमध्ये सुटुन आल्यावर स्वप्नील मराठे उर्फ चुहा, सोबत २) सागर चव्हाण, ३) विनय उर्फ लक्की भेलावे, ४) अमन पप्पु कैथवास, यांनी फिर्यादीच्या घराचा दरवाजा व काकाच्या घराचा दरवाजा तोडुन काकाला व मुलीला विट फेकुण मारून शिवीगाळ करून जुन्या वादावरून हाथाबुक्कीने मारून जिवाने मारण्याच्या उद्देशाने तलवारने जिवानीशी ठार मारण्याचे प्रयत्न केला.

सदर घटनेची माहिती मिळताच कन्हान पोलीसांनी आरोपीचा शोध घेणेकामी पथक तयार करून आरोपीचा शोध घेवुन आरोपी क्र. ३) याला अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीतांविरूद्ध कलम १०९, ३२४, (४), २९६, ३५१(२), ३५१(३) ,३(५), भा. न्या. संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राहुल चव्हान हे करीत आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना कळमेश्वर पोलीसांनी केले अटक

दिनांक १५/०८/२०२४ चे १९/१५ वा. दरम्यान **आरोपी नामे—१) कुणाल ढोके, रा. काटोल सोबत २) पुनित घनशाम बोंदरे, वय २३ वर्ष, रा. काटोल** यांनी संगनमत करून जखमी रूषी चर्जन यांचे पानठेल्यावर जावून फिर्यादी नामे— पवन रामदास चाके वय २६ वर्ष रा. वार्ड क्र १६ मोहपा तह. कळमेश्वर येथे व जखमींना तुम्ही दारू कशी विकता तुम्हाला मारून टाकतो असे बोलून तिघांना जिवे ठार मारण्याचे उददेशाने जखमी सोनम कावडकर यांचे उजवे हातावर, रूषी चर्जन यांचे डोक्यावर व फिर्यादीचे कानावर व पाठीवर त्यांचे हातातील काठीने मारहाण केली. तसेच जखमी रूषी चर्जनचे पानठेल्यात घुसून पानठेल्यातील साहीत्याची व काचाची तोडफोड करून अंदाजे ३,००,००० रू. चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीतांविरूद्ध कलम १०९, ३३३, ३२४(५), ३५१(३), ३(५) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. कळमेश्वर पोलीसांनी आरोपींना जीपीओ चौक नागपूर येथुन गोपनीय सुत्राद्वारे मिळालेल्या माहितीवरून अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि मनोज टिपले हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि काळबांडे, पोउपनि कोलते, मनोज टिपले, सफौ सुनिल मिश्रा, पोहवा दिनेश गाडगे, पोअं. मनिष, पोअं. हितेंद्र चौधरी यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**